महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ या अधिनियमाखाली अपराधाची दखल घेण्यासाठी विभागाचे संबंधित विभागीय शिक्षण उप संचालक यांना प्राधिकृत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः शाशैशु-२०१७/प्र.क्र. १९० /एसएम-६

मादाम कामा रोड, मंत्रालय, विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२
दिनांक :-०७ मार्च, २०१८

वाचा :-

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११,दिनांक २१ मार्च, २०१४

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित व तद्अनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरीता महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ राज्यात लागू केला आहे. सदर अधिनियमातील व त्याखाली केलेल्या नियमातील तरतूदींचे उल्लंघन करण्याऱ्यांविरुध्द अपराध व शास्तीबाबत कलम १६ ते कलम २० मध्ये तरतूद आहे. कलम १९ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे:-

"कोणतेही न्यायालय, शासनाच्या किंवा शासन याबाबतीत प्राधिकृत करील अशा शिक्षण उप संचालकांच्या दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्याच्या पूर्व मंजूरीखेरीज या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही."

२. सदर अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेण्यासाठी संबधित शैक्षणिक विभागाचे विभागीय शिक्षण उप संचालक यांना शासन याव्दारे प्राधिकृत करीत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०७१६०६०२३८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sangita Dinesh Shelke

Digitally signed by Sangita Dinesh Shelke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9ace0ca0b129ab4da8f9e911057d75e7fbf6f6bd0b55e8ff7ca0deacfa15e1c0, cn=Sangita Dinesh Shelke
Date: 2018.03.07 16:06:54 +05'30'

(संगिता दि.शेळके)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा, यांचे खाजगी सचिव.

२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त,शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) अध्यक्ष, राज्य पुनरिक्षण समिती /सर्व विभागीय शुल्क नियामक समिती
६) उपसचिव (शाळा व्यवस्थापन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
७) उप सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) महालेखापाल, (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१२) जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई.
१३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) शिक्षण सह संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६) सर्व विभागीय शिक्षण उप संचालक.
१७) कक्ष अधिकारी (प्रशासन-१), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) आहरण व संवितरण अधिकारी तथा कक्ष अधिकारी, रोख शाखा, शालेय शिक्षण व क्रीडा
१९) विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) वित्त विभाग (व्यय-५)/अर्थसंकल्प-८/सेवा-५/सेवा-६, मंत्रालय, मुंबई.
२१) निवड नस्ती (एस एम -६).